शुक्रवार ०१ मे २०२६

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०५ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । ०१/०५/२०२६ । पाने - ६




# बेकायदा गर्भलिंग तपासणी रॅकेटचा पर्दाफाश

## पोलिसांची धडक कारवाई; डॉक्टरसह ९ जण अटकेत, २४ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - श्रीरामपुर उपविभागात बेकायदा गर्भलिंग निदान तपासणी करणाऱ्या टोळीचा मोठा पर्दाफाश करण्यात आला असून, या प्रकरणात एका डॉक्टरसह एकूण ९ जणांना अटक करण्यात आली आहे. लोणी पोलीस स्टेशन व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संयुक्त कारवाईत ही धडक मोहीम पार पडली.

दि. २९ एप्रिल रोजी अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना गुप्त माहिती मिळाली होती की, राहाता तालुक्यातील पिंपरी निर्मळ शिवारात निळवंडे कॅनॉलजवळील एका खोलीत महिलांकडून प्रत्येकी १० हजार रुपये घेऊन बेकायदा गर्भलिंग तपासणी केली जात आहे. या माहितीच्या आधारे तात्काळ सापळा रचण्याचे आदेश देण्यात आले. लोणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करण्यात आले. ग्रामिण रुग्णालय लोणी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती पवार, तालुका समुचित प्राधिकारी डॉ. गोकुळ घोगरे, तसेच पंच यांच्या उपस्थितीत बनावट गर्भवती महिला ग्राहक पाठवून खात्री करण्यात आली.

सदर ठिकाणी गर्भलिंग तपासणी सुरू असल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी चारही बाजूंनी घेराव घालून छापा टाकला. यावेळी दोन खोल्यांच्या घरात आरोपी रंगेहात सापडले. चौकशीत आरोपींनी आपली नावे डॉ. राहुल भनगे (वय ३४,



नेवासा) व अभिजीत भुसाळ (वय ३०, राहाता) अशी सांगितली. हे दोघेही महिलांकडून पैसे घेऊन पोर्टेबल सोनोग्राफी मशीनद्वारे गर्भाचे लिंग सांगत असल्याचे उघड झाले.

या ठिकाणी तपासणीसाठी आलेल्या ८ गर्भवती महिलांचीही चौकशी करण्यात आली. या महिला बीड, संगमनेर, नाशिक, नांदगाव व पुणे येथून आल्याचे निष्पन्न झाले. त्यांचे नातेवाईक बाभळेश्वर येथे थांबले होते, तर महिलांना कारमधून घटनास्थळी आणण्यात आले होते.

छाप्यात पोलिसांनी सुमारे २४ लाख ९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये लाईफ प्लस यूएसजी पोर्टेबल मशीन, मोबाईल फोन, रोख

### २४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**छाप्यात पोलिसांनी खालील साहित्य जप्त केले:**
**पोर्टेबल सोनोग्राफी मशीन, ४ मोबाईल फोन, ५९ हजार रुपये रोख, वैद्यकीय साहित्य (जेल, टिश्यू इ.) तीन चारचाकी वाहने (स्विफ्ट, इटिंगा, वॅगनर)**
**एकूण जप्तीची किंमत: २४,०९,१००**

रक्कम, तसेच तीन चारचाकी वाहनांचा समावेश आहे. प्रवरा मेडिकल ट्रस्ट हॉस्पिटल, लोणी येथे तपासणी केली असता सर्व

### ८ गर्भवती महिलांची सुटका

**घटनास्थळी ८ गर्भवती महिला आढळून आल्या. त्या बीड, संगमनेर, नाशिक, नांदगाव, पुणे आदी भागांतून आल्या होत्या. सर्व महिला ३ ते ४ महिन्यांच्या गर्भवती असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले. त्यांच्या नातेवाईकांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.**

महिला गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. संबंधित महिलांचे पती व नातेवाईकांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९६१ तसेच पीसीपीएनडीटी कायदा १९९४ अंतर्गत लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी कोणतेही वैध प्रशिक्षण किंवा नोंदणी नसताना बेकायदा पद्धतीने गर्भलिंग तपासणी करून आर्थिक फायदा मिळवण्याचा प्रकार केल्याचे उघड झाले आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. पुढील तपास लोणी पोलीस करत आहेत. गर्भलिंग तपासणीवर कायद्याने बंदी असतानाही असे प्रकार सुरू असल्याचे उघड झाल्याने समाजात खळबळ उडाली आहे. या कारवाईमुळे अशा बेकायदा रॅकेट्सना मोठा धक्का बसला असून, पोलिसांच्या दक्षतेचे कौतुक होत आहे.

# बच्चू कडूंच्या हाती शिवसेनेचा धनुष्यबाण

## शेतकरी आणि दिव्यांग बांधवांसाठी निर्णय घेतल्याचा बच्चू कडूंचा दावा

मुंबई (वृत्तंसस्था)

शेतकरी, मजूर, दिव्यांगांसाठी आम्ही शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेणार आहोत, अशी घोषणा प्रहार जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली आहे. आमचे सगळे मुद्दे शिवसेनेने स्वीकारले आहेत. आमचे सगळे मुद्दे मान्य झाल्यानंतरच धनुष्यबाण हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.




प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्याकडून शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज भरला जाण्याची शक्यता असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे. गेल्या दोन दिवसांपासून बच्चू कडू शिवसेना शिंदे गटामध्ये प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसली. आता त्यांनी आपली भूमिका जाहीर केली.

बच्चू कडू म्हणाले, आम्ही शिवसेनेचा धनुष्यबाण शेतकरी, मजूर, दिव्यांगांसाठी हाती घेणार आहोत. काल परवा ज्या चर्चा झाल्या आमचे सगळे मुद्दे शिवसेनेने स्वीकारले आहेत. पेरणी ते कापणीपर्यंत सगळी कामे एमआरजीएसमध्ये घ्यावे, हमीभावात सुधारणा करण्यासाठी लढण्याची गरज आहे. लाडक्या बहिणींमधील विधवा बहिणी तशाच कोरड्या आहेत. शिंदे साहेबांनी दिव्यांगांचे मंत्रालय स्थापन केले मात्र त्याचे बळकटीकरण झाले नाही. हे सगळे मुद्दे मान्य झाल्यानंतरच धनुष्यबाण हाती घेण्याचा निर्णय घेत आहे, अशी घोषणा प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली आहे.

शिवसेनेची राजकीय ताकद मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करू. पण त्याबदल्यात आम्हाला शेतकऱ्याची, दिव्यांगांची ताकद हवी आहे. त्याबद्दल कुठलीही तडजोड होणार नाही, असेही बच्चू कडू यांनी ठामपणे सांगितले. शिंदे साहेबांच्या नेतृत्वात दिव्यांग मंत्रालय उभे राहिले असेल, तर त्याच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न झाला पाहिजे. शेतकऱ्याच्या लढाईत एक इंचही फरक पडणार नाही. प्रहार सामाजिक संघटना आणि प्रहार दिव्यांग संघटना काय राहणार. मात्र पूर्ण ताकदीने शिवसेना कशी वाढेल? त्यासाठी माझ्या अंगातील रक्ताचा प्रत्येक थेंब जितका पक्षासाठी धावणारा आहे, तितकाच माझ्या मजूर, शेतकरी आणि दिव्यांगांसाठी धावणार आहे.

आम्ही आमच्या राजकीय प्रवासाची शिवसेनेतून सुरुवात केली होती. माझ्या अजूनही बाळासाहेब ठाकरेंना शेतकरी कर्जमाफी संदर्भात लिहिलेले पत्र आहे. कापासाच्या भावासंदर्भात आम्ही राजीनामा दिला होता. आता पुन्हा शेतकऱ्यांचे आणि दिव्यांगांचे मुद्दे घेऊन आम्ही शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेत आहोत. हा धनुष्यबाण माझ्या शेतकरी, मजूर, वंचित घटकांच्या, दिव्यांगांसाठी कसा कामी येईल? तो उचलण्याचा प्रयत्न करू, असे बच्चू कडू म्हणाले. बच्चू कडू म्हणाले की, मला मंत्रीपदाचे काही नाही, मला काही मागायची सवय नाही, मला मंत्रीपद हवे असवे तर गुवाहाटीला गेलो होतो, तेव्हाच मागितले असते. लोक मंत्रीपदासाठी फिंल्डींग लावत होती, पण मी दिव्यांग मंत्रालयासाठी भांडत होतो हाच फरक आहे. आता जे घडतंय ते माझ्या ध्यानीमनी देखील नव्हते मला काहीच माहिती नव्हती, मी संत्र्याला पाणी देत होतो, तुमच्या बातम्या आल्या सुत्रांनी सांगितले. फोन केला हे केले, इथपर्यंत मी येण्याचे श्रेय मी माध्यमांना देतो, विधान परिषद माझ्या कानावर देखील नव्हती, हे कानावर टाकण्याचे काम माध्यमांनी केले.

# कच्च्या तेलाच्या किमतींचा भडका





नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

जगभरात पुन्हा एकदा महागाईचा मोठा धोका निर्माण झाला आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत प्रचंड वाढ पाहायला मिळत असून ब्रेंट क्रूड प्रति बॅरल १२० डॉलरच्या पार पोहोचले. ही पातळी गेल्या सुमारे चार वर्षांतील सर्वोच्च पातळी मानली जात आहे. यामागील सर्वात मोठं कारण अमेरिका आणि इराणमधील वाढता तणाव आणि 'होर्मुझची सामुद्रधुनी'मधील लष्करी संघर्ष हे आहे.

या संकटामुळे जागतिक तेल पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून बाजारात भितीचं वातावरण आहे. जर परिस्थिती लवकर सुधारली नाही तर याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होईल आणि जगातील अर्थव्यवस्था दबावाखाली येऊ शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. तेलाच्या किमतीतील वाढीचे प्रमुख कारण अमेरिका आणि इराणमधील वाढता संघर्ष हे आहे. अमेरिकेनं इराणच्या बंदरांवर नौदलाचा दबाव वाढवला असून तेल टँकर्स रोखण्याची कारवाईही तीव्र केली आहे. दुसरीकडे इराणनंही आपण मागे हटणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिलेत. या दोन्ही देशांमधील संघर्ष आता थेट तेल पुरवठ्यावर परिणाम करत आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यानं वाढलं संकटजगातील सर्वात महत्त्वाच्या तेल मार्गांपैकी एक असलेली 'होर्मुझची सामुद्रधुनी' जवळपास बंद झाली आहे. हा मार्ग जागतिक तेल पुरवठ्याचा मोठा हिस्सा सांभाळतो. तो बंद झाल्यामुळे कच्चे तेल, गॅस आणि पेट्रोलियम उत्पादनांची वाहतूक जवळजवळ थांबली आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मते हा आतापर्यंतचा सर्वात मोठा 'सप्लाय शॉक' ठरू शकतो. अहवालांनुसार, बाजारातील सुमारे १ अब्ज बॅरल तेलाचा पुरवठा प्रभावित होऊ शकतो. यामुळे जागतिक बाजारात घबराट वाढली आहे. पुरवठा आणि मागणी यातील संतुलन बिघडल्यामुळे येणाऱ्या दिवसांत किमती आणखी वाढू शकतात, असं व्यापाऱ्यांचं मत आहे. अमेरिकेच्या रणनीतीमुळे तणाव वाढण्याची शक्यताअमेरिका आता इराणशी संबंधित तेल टँकर्स जप्त करण्याचा आणि इतर देशांनाही या कारवाईत सामील करून घेण्याचा प्रयत्न करत आहे. याशिवाय मध्यपूर्वेमध्ये प्रगत शस्त्रे पाठवण्याची तयारीही केली जात आहे. यावरून हे संकट लवकर संपणार नसल्याचं स्पष्ट होत आहे.






# महाराष्ट्रात 'एक राष्ट्र, एक ई-चलन' लागू



मुंबई (वृत्तसंस्था)
महाराष्ट्र सरकारने 'एक राष्ट्र एक ई-चलन' प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. यामुळे वाहतूक नियमांची अधिक कठोर अंमलबजावणी सुनिश्चित होईल. यापूर्वी, ही योजना प्रमुख शहरांमध्ये प्रायोगिक प्रकल्प म्हणून राबविण्यात आली होती. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात आता वाहतूक नियमांबाबतची कठोरता वाढणार आहे. राज्य सरकारने 'एक राष्ट्र, एक ई-चलन' प्रकल्पाच्या अंमलबजावणीला अधिकृतपणे मंजुरी दिली आहे.

याचा उद्देश वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे हा आहे. गृह विभागाने जारी केलेल्या सरकारी निर्णयानुसार, या प्रकल्पासाठी १९.३५ कोटींची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. राज्याची परिवहन व्यवस्था अधिक पारदर्शक आणि डिजिटल बनवण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

ही योजना सुरुवातीला मुंबई, पुणे आणि नागपूरसारख्या प्रमुख शहरांमध्ये प्रायोगिक प्रकल्प म्हणून सुरु करण्यात आली होती. प्रायोगिक प्रकल्पाच्या यशानंतर, आता ती संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ई-चलन प्रणालीमुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे शक्य होईल. याव्यतिरिक्त, चलन प्रक्रिया अधिक पारदर्शक होईल आणि भ्रष्टाचाराची शक्यता कमी होईल. या नवीन प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे नियमांचे पालन न करता वाहन चालवणाऱ्यांना आळा बसेल. उल्लंघनासाठी तात्काळ डिजिटल चलन जारी केले जातील, ज्यामुळे रस्ते सुरक्षा सुधारण्याची अपेक्षा आहे.

# भंडारदरा पाणी व्यवस्थापनावर हायकोर्टाचे कडक आदेश

## एसडब्ल्यूएफ यंत्रणा सुरू करण्याचे निर्देश

युवावार्ता (वृत्तसंस्था)
अकोले - मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एसडब्ल्यूएफ पाणीमापक यंत्रणेला १५ दिवसांच्या आत परवानगी देण्याचा आणि त्यानंतर एका महिन्याच्या आत ही यंत्रणा पूर्णपणे चालू करण्याचा आदेश राज्य शासनाला दिला आहे. तसेच, भंडारदरा धरणाच्या पाणी लेखापरीक्षण करून नव्याने शपथपत्र दाखल करण्याचे आदेशही न्यायालयाने दिल्याची माहिती ॲड. अजित काळे यांनी दिली. भंडारदरा धरणावर कालव्यांच्या माध्यमातून जवळपास ५७ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे.

भंडारदरा धरणाची पाणी साठवण क्षमता ११ टीएमसी असून हे धरण जवळपास दरवर्षी पूर्ण क्षमतेने भरते. मात्र, शंभर वर्षांच्या कालावधीत पिण्याच्या पाण्याचा वापर, लोकसंख्या वाढ व औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात वाढले. त्याचबरोबर शहरीकरण झाल्यामुळे शेतीचा बराच मोठा भाग रहिवास व औद्योगिकीकरणासाठी वापरला गेला. यामुळे शेतीच्या सिंचन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

बोगस पाणी वाटप संस्था, बंद पडलेले औद्योगिक कारखाने, तसेच राजकीय लोकांनी तयार केलेल्या आता बंद पडलेल्या सोसायट्यांनाही पाणी परवाने देऊन पाण्याची मोठ्या प्रमाणात चोरी होत आहे. या संदर्भात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व युवराज जगताप यांच्यामार्फत ॲड. अजित काळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.



या याचिकेत भंडारदरा धरणाच्या पाण्याचे ऑडिट व्हावे, बंद संस्थांचे पाणी परवाने तात्काळ रद्द व्हावेत, महाराष्ट्र शासनाच्या जीआरप्रमाणे पाणी वाटपाचे नियोजन व्हावे, तसेच एसडब्ल्यूएफ पाणी मोजणी यंत्रणा प्रत्येक तालुक्याच्या सुरुवातीच्या भागात लावून ती योग्य रीतीने दुरुस्त व चालू करावी, अशा मागण्या केल्या होत्या. एसडब्ल्यूएफ यंत्रणा चालू करण्याचे तसेच १५ दिवसांत राज्य शासनाने परवानगी देऊन एका महिन्यांत यंत्रणा सुरु करण्याचे आदेश दिल्याचे ॲड. काळे यांनी सांगितले.

# भोंदू खरातच्या अडचणी वाढल्या

## सातव्या प्रकरणात १२ मे पर्यंत तुरुंगवास

युवावार्ता (प्रतिनिधी)
नाशिक - नाशिक न्यायालयाने फसव्या तांत्रिक अशोक खरातला त्याच्या सातव्या लैंगिक अत्याचार प्रकरणात न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. महिलांचे शोषण आणि फसवणूक केल्याचे गंभीर आरोप त्याच्यावर आहेत.



नाशिकमधील एका स्थानिक न्यायालयाने फसव्या अशोक खरातच्या विरोधात कठोर भूमिका घेतली असून, त्याला त्याच्या सातव्या लैंगिक अत्याचार प्रकरणात तुरुंगात पाठवले आहे. आधीच अनेक गंभीर आरोपांचा सामना करणाऱ्या खरातला, बुधवारी झालेल्या सुनावणीनंतर १२ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.अशोक खरातवर दैवी शक्ती असल्याचा दावा करून अनेक महिलांना आपल्या जाळ्यात ओढल्याचा आरोप आहे. त्याने केवळ महिलांचे लैंगिक शोषणच केले नाही, तर काळी जादू आणि कौटुंबिक समस्यांवर उपाय करण्याचे आश्वासन देऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूकही केली. आतापर्यंत त्याच्या विरोधात सात वेगवेगळे एफआयआर दाखल करण्यात आले आहे.

खरातच्या विरोधात दाखल झालेल्या सातव्या प्रकरणात, एका विवाहित महिलेने धक्कादायक खुलासे केले आहे. महिलेच्या म्हणण्यानुसार, ती तिच्या पतीसोबत कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी खरातकडे गेली होती. खरातने तिच्या पतीला कार्यालयाबाहेर बसायला सांगितले आणि तिला काही मादक पदार्थ दिला. ती बेशुद्ध आणि गुंगीच्या अवस्थेत असताना खरातने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. जेव्हा तिने प्रतिकार केला, तेव्हा आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी दिली आणि कोणाला सांगितल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला. न्यायालयाने यापूर्वी खरातला विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) कोठडीत पाठवले होते. बुधवारी त्याच्या अटकेचा कालावधी संपल्यावर त्याला न्यायालयात हजर केले जाणार होते. तथापि, प्रकरणाचे गांभीर्य आणि सुरक्षेच्या कारणास्तव, त्याला प्रत्यक्ष हजर करण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले. पोलिसांनी न्यायालयासमोर युक्तिवाद केला की प्रकरणाच्या तपासासाठी आरोपीची कोठडी आवश्यक आहे, त्यानंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली.

# वादग्रस्त नकाशा हटवला

## नेपाल एअरलाइन्सकडून दिलगिरी व्यक्त

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)
नेपाळ एअरलाइन्सला सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका नकाशामुळे मोठ्या वादाला सामोरे जावे लागले असून, या प्रकरणाने आंतरराष्ट्रीय स्तरावरही चर्चा निर्माण केली आहे. एअरलाइन्सने त्यांच्या नेटवर्क मॅपमध्ये जम्मू आणि काश्मीर हा भाग चक्क पाकिस्तानचा भाग म्हणून दाखवल्यामुळे गंभीर कार्टोग्राफिक चूक समोर आली होती.

ही पोस्ट बुधवारी (२९ एप्रिल) एअरलाइन्सच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून शेअर करण्यात आली होती. मात्र, काही मिनिटांतच युजर्सनी या नकाशातील चुकीकडे लक्ष वेधले. भारतातील तसेच परदेशातील अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांनी यावर तीव्र आक्षेप नोंदवत ही माहिती तथ्यात्मकदृष्ट्या चुकीची आणि संवेदनशील असल्याचे सांगितले.

वाद वाढताच एअरलाइन्सने तातडीने ही पोस्ट हटवली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत पोस्ट मोठ्या प्रमाणावर शेअर झाली होती आणि विविध प्लॅटफॉर्मवर यावर प्रतिक्रिया उमटू लागल्या होत्या. काही वापरकर्त्यांनी ही केवळ तांत्रिक चूक नसून गंभीर निष्काळजीपणा असल्याचे म्हटले, तर काहींनी अशा प्रकारच्या कंटेंटवर अधिक कठोर पडताळणी प्रक्रिया असावी, अशी मागणी केली.यानंतर नेपाळ एअरलाइन्सने एक्स (ट्विटर) वर अधिकृत निवेदन जारी करत स्पष्ट केले की, आमच्या सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेल्या नेटवर्क मॅपमध्ये झालेल्या चुकीबद्दल आम्ही मनापासून माफी मागतो. या नकाशामध्ये आंतरराष्ट्रीय सीमांचे चुकीचे चित्रण करण्यात आले असून, हे आमच्या संस्थेची अधिकृत भूमिका किंवा धोरण दर्शवत नाही.

एअरलाइन्सने पुढे असेही सांगितले की, संबंधित पोस्ट हटवल्यानंतर लगेचच अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली आहे. सोशल मीडिया कंटेंट प्रकाशित करण्यापूर्वी अधिक कडक पडताळणी प्रक्रिया लागू करण्याचा विचार केला जात असल्याचेही संकेत देण्यात आले आहेत, जेणेकरून भविष्यात अशा चुका टाळता येतील. संस्थेने आपल्या निवेदनात शेजारी देशाशी असलेल्या संबंधांबाबतही भूमिका स्पष्ट केली.

# अरुण उंडे यांचा जिल्हास्तरावर गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - येथील उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी २०२५-२०२६ दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ची प्रभावी अंमलबजावणी करून प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात आला.



जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, तसेच निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी 'राईट टू सर्व्हिसेस ॲक्ट २०१५' अंतर्गत महसूल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध सेवा, जातीचे दाखले, उत्पन्न प्रमाणपत्र आणि इतर ऑनलाईन सेवा, वेळेत आणि प्रभावी नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला. नागरिकांना शासकीय सेवा निश्चित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे प्रशासनावरचा विश्वास अधिक दृढ झाला. उंडे म्हणाले ही कामगिरी केवळ माझी नसून, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे प्रांताधिकारी उंडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यास शासन सकारात्मक - डॉ. पंकज भोयर



मुंबई (वृत्तसंस्था)
राज्यभरातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित मागण्या आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रश्नाबाबत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राज्यमंत्री डॉ भोयर बोलत होते. बैठकीस आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, उपसचिव आबासाहेब कवळे, संचालक (प्राथमिक) गोसावी, सहसंचालक श्रीराम पानझाडे यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री डॉ पंकज भोयर म्हणाले, गेल्या काही काळापासून तांत्रिक अडचणींमुळे अनेक शिक्षकांचे वेतन रखडले आहे. अशा सर्व शिक्षकांचे वेतन तातडीने अदा करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. याशिवाय, आदिवासी दुर्गम भागामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना 'एकस्तर वेतनश्रेणी' लागू करण्याबाबत सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी शिक्षण आयुक्त कार्यालयाला दिल्या.

शिक्षकांच्या संच मान्यतेबाबत असलेल्या तक्रारी आणि प्रस्तावातील त्रुटी यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी आता एकात्मिक उपाययोजना करावी. या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित केली जावीत. तसेच, संच मान्यतेशी संबंधित तक्रारी व अडचणींचे निवारण करण्यासाठी संचालक कार्यालयात एक स्वतंत्र आणि समर्पित कक्ष स्थापन करावा. अशाही सूचना राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्या.

कनिष्ठ महाविद्यालयांमधील सोयीसुविधा आणि उपलब्ध शिक्षक संख्या यांचा समतोल राखून, प्रात्यक्षिक वर्गाची क्षमता पूर्वीप्रमाणे ठेवण्याचे निर्देश देत राज्यमंत्री डॉ भोयर म्हणाले, शिक्षकांना सध्या जनगणनेची कामे आणि बीएलओ म्हणून निवडणूक विषयक कामे करावी लागत आहेत. या कामांचे समन्वय साधत पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. तसेच, शिक्षकांना अशैक्षणिक आणि ऑनलाईन कामे कमी करण्यासाठी अभ्यासगटाच्या माध्यमातून आढावा घेण्यात यावा.

महाराष्ट्र दिवस
आमच्या सर्व वाचक, जाहिरातदार व हितचिंतकांना महाराष्ट्र दिन, कामगार दिनच्या
हार्दिक शुभेच्छा
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

सुचना-
उद्या दि. १ मे कामगार दिनानिमित्त कार्यालयास सुट्टी राहील त्यामुळे ०२ मे चा अंक प्रकाशित होणार नाही याची नोंद घ्यावी

# कुंभमेळा २०२७ : ध्वजस्तंभांवर उमटणार समुद्रमंथनाची दिव्यता

युवावार्ता (प्रतिनिधी)
नाशिक - २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात मानाचे स्थान असलेल्या ध्वजस्तंभांचे पारंपरिक रूप या वेळी बदलेल. नाशिकच्या रामकुंडावर ५१ तर आणि त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्त तीर्थ येथे ३१ फुटी व नवीन घाटावर ५१ फुटी 'अमृतमंथन' ध्वजस्तंभ साकारण्यात येतील. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ७ कोटी ९ लाख रुपयांचा प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. पारंपरिक ध्वजस्तंभ या संकल्पनेला आध्यात्मिक संदर्भ देण्यात आला आहे. नाशिकचा गोदावरी पंचकोटी पुरोहित संघ आणि त्र्यंबकचा पुरोहित संघ यांच्या संकल्पनेतून या ध्वजस्तंभांवर समुद्रमंथन आणि त्यातून प्राप्त १४ रत्नांची हुबेहूब प्रतिकृती कोरली जाईल. स्तंभाच्या तळाशी गणपती व कमळाचे शुभचिन्ह असेल, तर शिखरावर भगवान विष्णूंचे वाहन असलेली 'गरुड' देवता विराजमान असेल. कुंभमेळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या वतीने ६ मे रोजी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या उपस्थितीत विशेष गोदा आरती सोहळा होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही निमंत्रित आहेत. तीन ठिकाणी हे ध्वजस्तंभ उभारले जाणार आहेत. भक्कमपणासाठी आतून 'स्टेनलेस स्टील ३१६ ग्रेड'चा पाइप आणि बाहेरील बाजूने पितळी नक्षीकाम असे याचे स्वरूप असेल.

हिंदू धर्मग्रंथांतील संदर्भानुसार समुद्रमंथनातून प्राप्त झालेल्या १४ रत्नांची मालिका स्तंभावर खालून वरच्या दिशेने कोरली जाईल. यामध्ये हलाहल विष, कामधेनू गाय, उच्चैःश्रवा अश्व, ऐरावत हत्ती, कौस्तुभ मणी, कल्पवृक्ष, रंभा (अप्सरा), लक्ष्मीदेवी, वारुणी (मदिरा), चंद्र, धन्वंतरी, पारिजात वृक्ष, पांचजन्य शंख आणि सर्वांत वरती अमृत कलश यांचा समावेश असेल. हे कोरीव काम स्तंभाला एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक मूल्य प्राप्त करून देईल.

# पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता

## एक्झिट पोलचा अंदाज



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)
पश्चिम बंगालमधील दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचे मतदान संपले आहे. पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांपेक्षा जास्त आणि दुसऱ्या टप्प्यात ९० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले आहे. यामुळे ममता बॅनर्जी सत्ता राखणार की भाजपची सत्ता येणार यावरून चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर एक्झिट पोलचे अंदाज येण्यास सुरुवात झाली आहे. प्रमुख संस्थांच्या एक्झिट पोलच्या अंदाजांनुसार पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे.

प्रजा पोलच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १७८ ते २०८ जागा जिंकेल तर पोल डायरीच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १४२ ते १७१ जागांवर बाजी मारेल. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार भारतीय जनता पार्टी १४६ ते १६१ जागांवर विजयी होईल. चाणक्य स्टॅटेजीझच्या एक्झिट पोलने भाजप १५० ते १६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त केला आहे. पश्चिम बंगालबाबतच्या जेव्हीसीच्या एक्झिट पोलनुसार भाजपला १५० ते १८० जागा जिंकता येतील. तसेच पीएमएआरक्यूच्या पश्चिम बंगालबाबतच्या एक्झिट पोलनुसार भाजप १५० ते १७५ जागा जिंकेल.

पश्चिम बंगालच्या विधानसभेत एकूण २९४ जागा आहेत. यामुळे १४७ किंवा त्यापेक्षा जास्त जागा जिंकल्यास स्पष्ट बहुमताच्या जोरावर भाजप सत्ता स्थापन करू शकेल. एक्झिट पोलचे अंदाज पश्चिम बंगालमध्ये भाजप बहुमत मिळवेल असाच अंदाज व्यक्त करत आहेत.

# तळेगाव दिघे पाणीपुरवठा योजनेचे कर्मचारी १ मे पासून संपावर

युवावार्ता (प्रतिनिधी)
समनापूर - संगमनेर तालुक्यातील तळेगाव व इतर सोळा गावे पाणीपुरवठा योजनेचे कर्मचारी १ मे पासून कामगार दिनाचे औचित्य साधून बेमुदत संपावर जाणार आहेत. याबाबतचे निवेदन राज्य प्रादेशिक नळ पाणीपुरवठा कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने प्रशासनाला देण्यात आले आहे.

संघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून योजनेवरील कर्मचारी अत्यंत जोखमीच्या परिस्थितीत काम करीत असूनही त्यांना तुटपुंजे वेतन दिले जाते. बहुतांश कर्मचारी ठेकेदारामार्फत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असून त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नाहीत. कामगार विमा, भविष्य निर्वाह निधी यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने तसेच आरोग्य सुविधा मिळत नसल्याने कर्मचारी अडचणीत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच योजनेवरील अत्यल्प कर्मचारी कार्यरत असून त्यांना १२ ते १४ तास काम करावे लागत आहे. मात्र कर्मचाऱ्यांच्या तुलनेत मिळणारे वेतन अत्यंत कमी असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. शासनाच्या कामगारांचा आकृतिबंध तयार करून नियमानुसार वेतन देण्याचे निर्देश असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याचेही म्हटले आहे.



या मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वेळोवेळी निवेदने देण्यात आली. मात्र अद्याप कोणताही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने संघटनेच्यावतीने संताप व्यक्त केला जात आहे. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उद्या दि. १ मे पासून जिल्ह्यातील सर्व प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेवरील कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा निर्णय संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

तरी शासनाने कामगारांचा विचार करून त्यांना वेळीच न्याय द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटी कामगार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष विजय विठ्ठल खुळे यांनी केली आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
||जय श्रीराम||
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# पत्रकार अमोल मतकर यांचा पत्रकार संघातर्फे गौरव



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

वडगावपान येथील भोंदूगिरीचा पर्दाफाश करून समाजात जागृती निर्माण करणारे पत्रकार अमोल मतकर यांचा संगमनेर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुनील नवले यांच्या हस्ते मतकर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष संजय आहिरे होते. मतकर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून चालणाऱ्या या भोंदूगिरीविरुद्ध जो लढा दिला, तो पत्रकारितेची मूल्ये उंचावणारा असल्याचे गौरवोद्गार नवले यांनी काढले. यावेळी मतकर यांचे सहकारी सचिन जंत्रे यांच्याही कामाचे कौतुक करण्यात आले.

याच सोहळयात केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल पत्रकार आणि चित्रकार आनंद गायकवाड यांचाही ज्येष्ठ पत्रकार श्याम तिवारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी नीलिमा घाडगे, सचिव शेखर पानसरे, सदस्य गोरक्षनाथ मदने, सोमनाथ काळे, सुनील महाले, भारत रेघाटे, बाबासाहेब कडून, मंगेश सालपे, संदीप वाकचौरे व काशिनाथ गोसावी आदी पत्रकार उपस्थित होते. प्रास्ताविक शेखर पानसरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नीलिमा घाडगे यांनी मानले.

# साकूर महावितरणचा गलथान कारभार

## संतप्त शेतकऱ्याने सहायक अभियंत्याला घातला हार





संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील साकूर येथील महावितरणचा गलथान कारभार समोर आला आहे. गेल्या महिनाभरापासून शेतकरी जयराम ढेरंगे यांच्या शेतात महावितरणचा विद्युत पोल एका बाजूला झुकल्याने, वीजेच्या तारा अक्षरशः पडलेल्या अवस्थेत असल्याने जिवीतहानी होण्याची भिती निर्माण झाली आहे. शेतकरी जयराम ढेरंगे यांनी साकूर महावितरणचे सहाय्यक अभियंता राजेशकुमार झा व महावितरण कर्मचाऱ्यांना, शेतात पडलेल्या विद्युत तारा तातडीने पूर्ववत करण्यासाठी वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष केल्याने, शेतकरी जयराम ढेरंगे यांनी थेट साकूर महावितरण कार्यालय गाठून सहाय्यक अभियंता राजेशकुमार झा यांना धारेवर धरत, गळ्यात हार आणि शाल घालत संताप व्यक्त केला. लवकरात लवकर जर विस्कळीत झालेल्या विद्युत तारा पूर्ववत नाही केल्या, तर आमरण उपोषणाचा इशाराच शेतकरी जयराम ढेरंगे यांनी सहाय्यक अभियंता राजेशकुमार झा यांना दिला.

साकूर येथे शेतकरी जयराम ढेरंगे हे वास्तव्यात आहे. सदर ठिकाणी त्यांची मोठी शेती आहे. मात्र, महिनाभरापूर्वी जयराम ढेरंगे यांच्या शेताच्या बांदावरील महावितरणचे विद्युत पोल एका बाजूला झुकले आहे. पोल झुकल्याने विद्युत वाहक तारा अक्षरशः शेतातच पडलेल्या आहे. त्यामुळे मोठी जीवीतहानी होण्याची शक्यता आहे. या भितीमुळे जयराम ढेरंगे यांना शेतीचं कामही करता येत नसल्याने सदर क्षेत्रातील काम ठप्प झाले आहे. सदर विद्युत वाहक तारा पूर्ववत करण्यासाठी जयराम ढेरंगे यांनी साकूर महावितरणचे सहाय्यक अभियंता राजेशकुमार झा यांना व कर्मचाऱ्यांना वारंवार संपर्क केला. मात्र, आज होईल, उद्या होईल, या अपेक्षेने जवळपास महिना उलटून गेला.

मात्र, तरी देखील गेंड्याचे कातडे पांघरून बसलेल्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांनी या गोष्टीकडे साधं लक्ष दिले नाही. शेतात पडलेल्या वीजेच्या तारांमुळं एखाद्या जीवीतहानीची वाट महावितरणचे अधिकारी बघतायेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. महावितरणकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याने, शेतकरी जयराम ढेरंगे यांनी शेवटी साकूर महावितरण कार्यालय गाठले आणि सहाय्यक अभियंता राजेशकुमार झा यांना धारेवर धरत, आमचा जीव गेल्यावर या वीजेच्या तारा पूर्ववत करणार का? असा सवाल उपस्थित केला.

यावेळी संतप्त झालेल्या जयराम ढेरंगे यांनी सहायक अभियंता राजेशकुमार झा यांना गळ्यात हार आणि शाल देऊन संताप व्यक्त केला. तसेच, जर लवकरात लवकर शेतात पडलेल्या विद्युत वाहक तारा पूर्ववत नाही केल्या, तर महावितरण कार्यालयासमोरच आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशाराच यावेळी जयराम ढेरंगे यांनी दिला.

# संगमनेरात श्री गणेश विग्रह प्राणप्रतिष्ठा सोहळा

## स्वकुळ साळी समाजाचा त्रिदिवसीय भव्य धार्मिक उत्सव



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

येथील रंगारगल्लीतील ऐतिहासिक अशा श्री लक्ष्मीनारायण मंदिराचा जिर्णोध्दार आणि भगवान श्री जिव्हेश्वर प्राणप्रतिष्ठा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाल्यानंतर, आता स्वकुळ साळी समाज व श्री लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टच्या वतीने भगवान श्री गणेश विग्रह प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा १ मे ते ३ मे २०२६ या कालावधीत संपन्न होणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष वैभव ढोरे व प्रकल्प प्रमुख भारतशेठ भागवत यांनी दिली आहे.

सोहळ्याची सुरुवात शुक्रवार, दि. १ मे रोजी सकाळी ९.०० वाजता भगवान श्री गणेशाच्या भव्य शोभायात्रेने होईल. ही शोभायात्रा श्री लक्ष्मीनारायण मंदिर, नगरपालिका, गांधी चौक, रंगार गल्ली, या मार्गे मार्गक्रमण करून पुन्हा मंदिरात येईल. या धार्मिक विधींचे मुख्य पुरोहित म्हणून नाशिक येथील प्रसिद्ध शास्त्रशुद्ध मार्गदर्शक डॉ. गणेश जोशी गुरुजी व त्यांचे सहकारी ब्रह्मवृंद काम पाहणार आहेत. या पूजेचे यजमानपद मुंबई येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती शांताबाई जंत्रे भूषवणार आहेत. शनिवार, दि. २ मे रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत श्री गणेश याग व धार्मिक विधी पार पडतील. या दिवशी सायंकाळी ६.३० वाजता संगमनेरच्या सुकन्या व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मा. सौ. निलम प्रशांत वाव्हळ (डी.वाय.एस.पी., ठाणे ग्रामीण) यांचे महिला, युवक आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी ९.०० ते १२.३० या वेळेत मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना व पूर्णाहुती होईल. सायंकाळी ६.०० वाजता महाआरती झाल्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यासाठी राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. यामध्ये, डॉ. मैथिली सत्यजीत तांबे (नगराध्यक्ष, संगमनेर), बालाजीराव कांबळे (अध्यक्ष, अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज, तेलंगणा), उदय दुधाने (अध्यक्ष, स्वकुळ साळी समाज, महाराष्ट्र राज्य), डॉ. संजयजी मालपाणी (कार्याध्यक्ष, गीता परिवार), मा. श्री. व्यंकटेश मोहनराव धोत्रे (चीफ सेक्रेटरी, एज्युकेशन, तेलंगणा राज्य), मा. श्री. अविनाश पुरे (उपजिल्हाधिकारी, धुळे), नीलम वाव्हळ, कल्याण (डी.वाय.एस.पी., ठाणे ग्रामीण), अश्विनी मते (नगरसेविका, मुंबई महानगरपालिका), शोभाताई सोनारे, पैठण (मा. नगराध्यक्ष, पैठण नगरपरिषद), विशाल साळी, (नगरसेवक, पुणे महानगरपालिका), दीपक कराड, शिरीष जठार,, उमेश वाव्हळ, दिलीप पोरे, येथील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख भारत शेठ भागवत, अध्यक्ष वैभव ढोरे व सर्व समस्त विश्वस्त मंडळ, तसेच प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे सन्माननीय सदस्य, स्वकुळ साळी महिला मंडळ, युवक मंडळ व समस्त विश्वस्त मंडळ परिश्रम घेत आहेत. या त्रिदिवसीय सोहळ्यास समस्त सर्व समाज बांधवांनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन श्री लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# अकोलेतील पाच ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांचा निकाल जाहीर

अकोले

(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकांचा निकाल बुधवारी (दि. २९) घोषित करण्यात आला. यामध्ये राजूर ग्रामपंचायतच्या एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपचे अक्षय गणपत देशमुख यांनी एकतर्फी विजय संपादन केला. तर पाडोशी गावच्या सरपंच पदाच्या थेट पोटनिवडणुकीत गोरक्ष येसू साबळे हे विजयी झाले.

राजूर, समशेरपूर, पाडाळणे, कोंभाळणे, पाडोशी या ग्रामपंचायतच्या काही जागांसाठी पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला होता. त्यानुसार मंगळवारी शांततेत मतदान झाले. बुधवारी सकाळी दहा वाजता अकोले तहसील कार्यालय येथे मतमोजणीस सुरुवात झाली. पाडोशी या एकमेव गावच्या अनुसूचित जमाती वर्गाच्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीसाठी पाच उमेदवार निवडणूक रिंगणात होते. गोरक्ष साबळे यांनी २६४ मते मिळवत या निवडणुकीत विजय संपादन केला. प्रतिस्पर्धी प्रतीक बाळू साबळे ११८, रामदास मधू भांगरे ४७, लक्ष्मण किसन भांगरे २४० व अरुण दिलीप साबळे १६२ यांचा पराभव केला.

आजी-माजी आमदारांचे गाव असणाऱ्या राजूर ग्रामपंचायतच्या एका जागेच्या पोटनिवडणुकीत माजी सरपंच गणपत देशमुख यांचे चिरंजीव, भाजप युवा मोर्चाचे राजूर शहराध्यक्ष अक्षय देशमुख यांनी ४८५ मते मिळवत्त विजय संपादन केला. त्यांनी विठ्ठल रावजी देशमुख यांचा (२०९ मते) पराभव केला. प्रमोद देशमुख यांनी आपला सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे ही पोटनिवडणूक लागली होती. तसेच समशेरपूर ग्रामपंचायतच्या अनुसूचित जाती स्त्री वर्गाच्या पोटनिवडणुकीत लता दीपक जगताप यांनी ३४६ मते मिळवत प्रतिस्पर्धी मीरा दादा साळवे २३२ यांचा पराभव केला. तर बाबुराव निवृत्ती मेंगाळ हे बिनविरोध विजयी झाले.

कोंभाळणे ग्रामपंचायत अनुसूचित जमाती स्त्री या एका जागेच्या पोटनिवडणुकीत अत्यंत चुरशीच्या लढाईत सीता मधुकर बांबळे १२४ यांच्यावर १४ मतांनी, म्हणजेच १३८ मते मिळवत मनीषा सीताराम बांबळे यांनी विजयश्री खेचून आणली. पाडाळणे ग्रामपंचायतच्या अनुसूचित जमाती स्त्री या एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत मीनाक्षी मारुती शेंगाळ यांनी २६७ मते मिळवत अश्विनी मच्छिंद्र बगाड ३२ यांच्यावर एकतर्फी विजय मिळविला, तर वांजुळशेत/पुरुषवाडी ग्रामपंचायतच्या पोटनिवडणुकीत सविता काशिनाथ चिखले, पिंपळदरावाडी येथे शैला पोपट भांगरे, घोटी ग्रामपंचायतमध्ये प्रियंका सुनील डावखर, अंजना देविदास भांगरे, काशिनाथ सोमा बांबळे व सुप्रिया दत्तात्रय घोडे या बिनविरोध निवडून आल्या.

अवघ्या तासाभराच्या आतच सर्व निकाल घोषित करण्यात आले. विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी गुलालाची मुक्त उधळण करत एकच जल्लोष साजरा केला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे व निवासी नायब तहसीलदार किसन लोहारे यांनी काम पाहिले.

# माझी ओळख – एक शिक्षिका म्हणून माझा प्रेरणादायी प्रवास...



मी एक शिक्षिका आहे. शिक्षिका होणं ही माझ्यासाठी केवळ नोकरी नसून, विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याची एक सुंदर संधी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावरचा आनंद, त्यांची प्रगती आणि त्यांच्यात होणारा बदल पाहणं, हेच माझ्यासाठी खऱ्या अर्थाने समाधान देणारं आहे.

मी जेव्हा शाळेत प्रथम रुजू झाले, तेव्हा मनात खूप उत्साह होता, पण त्याचवेळी थोडी भीती आणि संकोचही होता. नवीन वातावरण, नवीन विद्यार्थी, नवीन सहकारी आणि नवीन जबाबदाऱ्या-हे सगळं माझ्यासाठी एक मोठं आव्हान होतं. सुरुवातीला वर्गासमोर उभं राहून शिकवताना थोडं दडपण यायचं. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना, त्यांना समजून घेताना आणि त्यांच्याशी जुळवून घेताना, मला वेळ लागला.

या सगळ्याबरोबरच माझ्या आयुष्यात काही अडचणी देखील होत्या. कधी आत्मविश्वास कमी वाटायचा, कधी स्वतःवर शंका यायची. पण त्या अडचणींवर मात करत, मी हा प्रवास सुरू ठेवला. प्रत्येक समस्येला एक संधी मानून, मी स्वतःला अधिक मजबूत बनवलं. त्या अडचणींनीच मला पुढे जाण्याची प्रेरणा दिली आणि मी हळूहळू अधिक सक्षम बनत गेले.

आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आता मला माझ्या कामात आत्मविश्वास वाटतो आणि वर्गात उभं राहून शिकवताना आनंदही मिळतो. विद्यार्थ्यांशी माझं एक सुंदर आणि विश्वासाचं नातं तयार झालं आहे. त्यांच्या छोट्या छोट्या यशातही मला खूप आनंद मिळतो. आज मी केवळ विषय शिकवणारी शिक्षिका नाही, तर विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवणारी, त्यांना प्रेरणा देणारी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न करणारी एक मार्गदर्शक बनले आहे.

या संपूर्ण प्रवासात मला अनेकांचा आधार मिळाला, पण विशेषतः माधुरी शेवाळे मॅडम यांचं मार्गदर्शन, माझ्यासाठी खूप महत्त्वाचं ठरलं. त्यांनी मला केवळ एक शिक्षिका म्हणूनच नाही, तर एक व्यक्ती म्हणूनही घडवलं. सुरुवातीच्या काळात, जेव्हा मला आत्मविश्वास कमी वाटायचा, तेव्हा त्यांनी नेहमी मला प्रोत्साहन दिलं. प्रत्येक छोट्या गोष्टीत त्यांनी मला मार्गदर्शन केलं-वर्ग कसा हाताळायचा, विद्यार्थ्यांशी कसं वागायचं, आणि स्वतःवर विश्वास कसा ठेवायचा, हे त्यांनी मला शिकवलं.

माधुरी शेवाळे मॅडम यांनी माझ्या चुका समजावून सांगितल्या, पण त्याचवेळी त्या सुधारण्यासाठी योग्य दिशा देखील दिली. त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे आणि सततच्या पाठिंब्यामुळे, मी प्रत्येक अडचणीवर मात करू शकले. त्यांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास, हा माझ्यासाठी सर्वात मोठं बळ ठरलं. त्यांच्या प्रेरणेमुळेच, आज मी अधिक आत्मविश्वासाने, जबाबदारीने आणि आनंदाने माझं काम करू शकते.

आज मी अभिमानाने सांगू शकते, की एक शिक्षिका म्हणून माझा प्रवास अजूनही सुरू आहे. मी दररोज काहीतरी नवीन शिकते, स्वतःमध्ये सुधारणा करते आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनापासून प्रयत्न करते. माझ्या या प्रवासात मिळालेलं मार्गदर्शन, विशेषतः माधुरी शेवाळे मॅडम यांचा पाठिंबा, हे माझ्यासाठी कायम प्रेरणादायी राहील.

**– दिपाली गुंजाळ**
**संगमनेर**

SUBSCRIBE
YOUTUBE
Daily Yuvavarta

# पंजाब राज्य सचिवालयाच्या वतीने डॉ. पोपेरे यांना 'भारत विभूषण' सन्मान



राजूर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

पंजाब विधानसभा सचिवालय, चंदीगड यांच्या वतीने भारत विभूषण सन्मान २०२६, पंजाब राज्य विधानसभेमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या सन्मान कार्यक्रमाला पंजाब राज्य विधानसभा अध्यक्ष मा. ना. सरदार कुलजर सिंग, व विधानसभा उपाध्यक्ष मा. ना. सरदार जय किसान सिंग, व मा. ना. श्री राम लोक खयना, सेक्रेटरी, पंजाबी विधानसभा सचिवालय, व मा. ना. सरदार सुरेंद्र सिंग मोती, सेक्रेटरी विधानसभा अध्यक्ष, पंजाब राज्य, मा. अभिषेक गिलार, अधिविष्ट ज्वेलर, जयपूर, राजस्थान, मा. संस्थापक अध्यक्ष भारत, डॉ. अतुल शर्मा, व मा. सेक्रेटरी श्रीमती रेणू गुप्ता, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील डी. लिट. डॉ. व्ही. व्ही. पोपेरे, आदिवासी सेवक (महाराष्ट्र शासन), तथा भारत नेपाळ मैत्री फोरम, भारत देश उपाध्यक्ष, नवी दिल्ली, भारत, यांना राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय व प्रामाणिक समाजकार्याची दखल घेऊन पंजाब राज्य विधिमंडळ सचिवालय यांच्यावतीने, पंजाब राज्य विधिमंडळ अध्यक्ष यांच्या हस्ते भारत विभूषण सन्मान २०२६, पंजाब राज्य विधिमंडळामध्ये प्रदान करण्यात आला.

डॉ. पोपेरे यांचे महाराष्ट्र राज्य व संपूर्ण देशांमध्ये नवतरुणांना एक नवीन प्रेरणा व दिशा देणारे कार्य आहे, व त्यांचे समाजाप्रती फार मोठे योगदान आहे. या कार्यक्रमाकरीता संपूर्ण देशांमधून व विविध राज्यातील काही प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम मोठ्या उत्साहात पंजाब विधानसभा, चंदीगड येथे संपन्न झाला.

# संपादकीय...

## उन्हाळ्याचा तडाखा, दुधउत्पादनात घट

महाराष्ट्रात यंदाच्या उन्हाळ्याने तीव्र स्वरूप धारण केले असून तापमान सतत चाळीस अंशांच्या पुढे जात असल्याने केवळ माणसांनाच नव्हे तर पशुधनालाही मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे आणि याचा थेट परिणाम दुधउत्पादनावर दिसून येत आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला दुग्ध व्यवसाय हा सध्या अनेक अडचणींच्या कचाट्यात सापडला आहे. पाण्याची तीव्र टंचाई, चाऱ्याचा अभाव, वाढलेली उष्णता आणि पशुधनाच्या आरोग्यावर होणारा परिणाम या सर्व घटकांमुळे दुधउत्पादनात लक्षणीय घट होत आहे. विशेषतः मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने शेतकऱ्यांना जनावरांना पुरेसे पाणी देणेही कठीण झाले आहे. जनावरांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास त्यांची भूक मंदावते, पचनक्रिया बिघडते आणि परिणामी दुधनिर्मिती कमी होते. याशिवाय हिरव्या चाऱ्याचा तुटवडा ही आणखी एक गंभीर समस्या बनली आहे. उन्हाळ्याच्या काळात शेतीतील उत्पादन घटल्यामुळे जनावरांना पोषक आहार मिळत नाही आणि कोरड्या व निकृष्ट दर्जाच्या चाऱ्यावर त्यांचा निभाव लागत असल्याने त्यांची शारीरिक क्षमता कमी होते. उष्णतेच्या वाढत्या तडाख्यामुळे जनावरांमध्ये उष्माघाताचा धोका वाढतो, ज्यामुळे त्यांची हालचाल कमी होते आणि ते तणावाखाली राहतात. हा ताण थेट दुधउत्पादनावर परिणाम करतो. दुभत्या गायी आणि म्हशींना योग्य तापमान, स्वच्छ पाणी आणि संतुलित आहाराची आवश्यकता असते, परंतु सध्याच्या परिस्थितीत ही सर्व गरजा पूर्ण करणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. अनेक ठिकाणी गोठ्यांमध्ये योग्य वायुवीजन नसल्याने उष्णता अधिक वाढते आणि जनावरांना त्रास होतो. परिणामी त्यांची दूध देण्याची क्षमता दिवसेंदिवस घटत आहे. याशिवाय पशुवैद्यकीय सेवांचा अभावही अनेक ग्रामीण भागांमध्ये जाणवतो. वेळेवर उपचार न मिळाल्यास जनावरांचे आरोग्य बिघडते आणि दुधउत्पादनात आणखी घट होते. सध्याच्या परिस्थितीत पशुखाद्याच्या किमतीत झालेली वाढ हीदेखील एक महत्त्वाची समस्या आहे. महागड्या खाद्यामुळे लहान शेतकऱ्यांना जनावरांना योग्य पोषण देणे कठीण जाते. अनेक शेतकरी आर्थिक अडचणींमुळे पशुधन विकण्याचा विचार करत आहेत, ज्यामुळे भविष्यात दुधउत्पादनावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे पाण्याची उपलब्धता आणि गोठ्यांमधील थंडावा राखणे अवघड होते. या सर्व अडचणींचा एकत्रित परिणाम म्हणून राज्यातील दूध संकलन केंद्रांमध्ये येणाऱ्या दुधाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे. या संकटातून मार्ग काढण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांनी जनावरांसाठी सावलीची व्यवस्था करणे, गोठ्यांमध्ये पाण्याची फवारणी करून तापमान नियंत्रित ठेवणे, तसेच शक्य तितक्या प्रमाणात हिरवा चारा साठवून ठेवणे गरजेचे आहे. शासनानेही पशुधनासाठी चारा छावण्या उभारणे, पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे आणि पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. तसेच दुग्ध व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि अनुदान देणेही महत्त्वाचे ठरेल. उन्हाळ्याच्या वाढत्या तीव्रतेमुळे निर्माण झालेले हे पशुधन संकट केवळ दुधउत्पादनापुरते मर्यादित नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन शाश्वत उपाययोजना राबविणे ही काळाची गरज आहे. अन्यथा भविष्यात दुधउत्पादनात आणखी घट होऊन दुग्ध व्यवसायावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

वाटचाल तीन दशकांची

पाहिजेत


अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com


# डॉ. दाभोळकर हत्या प्रकरणातील दोषी शरद कळसकरला मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर



मुंबई (प्रतिनिधी)- महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्या प्रकरणात विशेष सीबीआय न्यायालयाने सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना दोषी ठरवून सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, तर सबळ पुराव्याअभावी इतर तिघांची निर्दोष मुक्तता केली होती. मात्र, आता या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दोषी शरद कळसकरचा जामीन मंजूर केल्यामुळे त्याची कारागृहातून सुटका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणात विशेष सीबीआय न्यायालयाने वीरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली होती, तर सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना २०२४ मध्ये दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला शरद कळसकरने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले असून, आपल्या अपिलावर निकाल लागेपर्यंत जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने कळसकरचा युक्तिवाद ग्राह्य धरत त्याला ५० हजार रुपयांच्या जामिनावर मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. २० ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या डॉ. नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणात सीबीआयच्या विशेष न्यायालयाने पुणे महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी आणि एका प्रत्यक्षदर्शीच्या जबाबाच्या आधारे सचिन अंदुरे व शरद कळसकर यांना दोषी ठरवले असून, त्यांना ५ लाख रुपये दंड किंवा तो न भरल्यास अतिरिक्त एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याउलट, हत्येचा कट रचल्याचा आरोप असलेले वीरेंद्र तावडे यांच्यासह संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. दरम्यान, सीबीआय विशेष न्यायालयाने सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना सश्रम आजन्म जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेली नाही. सबळ पुरव्यांअभावी तिघेही निर्दोष सुटणे हे सीबीआयचे मोठे अपयश मानले जात आहे.

# आश्वी खुर्द ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर




आश्वी (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील तसेच शिर्डी विधानसभा मतदारसंघातील आश्वी खुर्द ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील पोटनिवडणुकीत, ना. राधाकृष्ण विखे पाटील गटाच्या साक्षी सिद्धार्थ देशवंडीकर यांनी विजय मिळविला. या निवडणुकीत माजी आ. बाळासाहेब थोरात गटाने शेवटच्या टप्प्यापर्यंत जोरदार लढत दिल्याने, निवडणुकीत चांगलीच रंगत निर्माण झाली होती. मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी झालेल्या मतदानात, प्रभाग क्रमांक २ मध्ये एकूण ६१७ मतदान झाले. त्यामध्ये साक्षी देशवंडीकर यांना ३३१ मते, पूजा गायकवाड यांना २७६ मते, तर १० मते नोटाला पडली. त्यामुळे साक्षी देशवंडीकर या ५५ मतांनी विजयी ठरल्या.

या विजयासाठी विखे गटाकडून कारखान्याचे संचालक अनिल भोसले, प्रवरा फळे भाजीपाला विखे पाटील सोसायटी, प्रवरानगरचे चेअरमन मकरंद गुणे, माजी संचालक डॉ. दिनकर गायकवाड, बाळासाहेब मांढरे, प्रवरा बँकेचे संचालक बापुसाहेब गायकवाड, बापुसाहेब निवृत्ती गायकवाड यांनी नेतृत्व केले. तर थोरात गटाचे नेतृत्व विठ्ठल उर्फ तात्यासाहेब गायकवाड यांनी केले.

मतदारांनी विकासकामांच्या पाठीशी उभे राहत, पुन्हा एकदा ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. पुढील काळात गावातील विकासकामांना अधिक गती देण्यात येईल, असा विश्वास सरपंच अलकाताई बापुसाहेब गायकवाड यांनी व्यक्त केला.

# मुंबई–पुणे मिसिंग लिंक प्रकल्पाचे महाराष्ट्र दिनी लोकार्पण



मुंबई (प्रतिनिधी)- मुंबई आणि पुणे या दोन शहरांमधील अंतर कमी करण्यासाठी आणि घाट क्षेत्रातील वाहतूक कोंडीतून प्रवाशांची मुक्तता करण्यासाठी अतिशय महत्त्वाकांक्षी असलेल्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे लोकार्पण १ मे २०२६ रोजी 'महाराष्ट्र दिनी' होणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) वतीने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील प्रवास आता अधिक सुरक्षित, इंधन वाचवणारा, वेगवान आणि विनाअडथळा होणार आहे.

१ मे रोजी दुपारी १२.३० वाजता खोपोली एक्झिटजवळील पूल क्रमांक १, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मार्गाचे लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहेत. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित राहणार आहेत.

हा प्रकल्प केवळ रस्ता नसून आधुनिक अभियांत्रिकीचा एक अद्भुत नमुना आहे. याचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे यातील २३.५ मीटर रुंदीचा बोगदा, ज्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून करण्यात आली आहे. हा बोगदा लोणावळा तलावाच्या चक्क १८० मीटर खालून खोदण्यात आला आहे.

मिसिंग लिंक प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे केबल-स्टेड ब्रिज, ज्यामध्ये ६५० मीटर लांबीचा केबल-स्टेड ब्रिज असून त्याच्या पूल पायलॉनची उंची १८२ मीटर आहे, जो भारतातील सर्वात उंच रस्त्यावरील पूल ठरला आहे. तसेच घाट क्षेत्रातील वळणावळणाचे रस्ते आणि वाहतूक कोंडी टाळल्यामुळे प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी हा मिसिंग लिंक प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून या प्रकल्पामुळे आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीलाही गती मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.


SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta

**नावात बदल**

मी अर्चना श्रीकांतसिंग परदेशी, माझा मुलगा श्रेयश श्रीकांतसिंग परदेशी याचे नाव बदलून श्रेयशसिंग श्रीकांतसिंग परदेशी करत आहे.

पत्ता– संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा– अहिल्यानगर

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
SAYYED BHAIYA ALIMOHAMED
TO NEW NAME AS
BHAIYA ALIMOHAMMAD SAYYAD
ADD- SAHARA COLONY, KOLHEWADI ROAD, TAL- SANGAMNER, 422605

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पतसंस्थेस कार्यालयासाठी जागा पाहिजे**

संगमनेर शहराच्या बसस्थानक, नविन नगर रोड, जाणता राजा मार्ग व मार्केट यार्ड, नाशिक रोड परिसरात पतसंस्था कार्यालयासाठी अंदाजे १ ते २ गुंठे कारपेट क्षेत्राची बांधीव किंवा प्लॉट (ओपन स्पेस) जागा मालकी तत्वावर घेणे आहे. इच्छुकांनी सात दिवसात जागेचा नकाशा, आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व अपेक्षीत दर इत्यादी माहितीसह पतसंस्था कार्यालयाच्या पुढील पत्त्यावर सत्वर अर्ज करावेत.

संपर्क
श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मालाणी निवास, बाजारपेठ, संगमनेर
मो. ९८२२६७६१७८, ९८२२६०८३६७

**भाड्याने देणे आहे**

रुम भाड्याने देणे आहे
२०० स्क्वे.फुट सर्व सुविधांयुक्त
पत्ता– शिवाजी नगर गल्ली, नं.१, संगमनेर
९४०४९१७९१२
९४०३१५४०१७

**पाहिजेत**

युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे

| | |
|---|---|
| उपसंपादक - | १ |
| जाहिरात व्यवस्थापक - | १ |
| डिझायनर - | १ |
| वितरण व्यवस्थापक - | १ |
| टेलिकॉलर - | १ |

कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२, ९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**

सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला १२ X १२ फूट गाळा
भाड्याने देणे आहे
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

**ड्रायव्हर पाहिजे**

कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे
आकर्षक पगार
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**

अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
शिक्षण – बारावी व त्यापुढील
8999862759

**पाहिजेत**

मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल अँण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते–वाघापूर, ता. संगमनेर, जि– अहिल्यानगर
9657230023

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६









दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर, ०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या, व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# मराठीचा जागर ... महाराष्ट्र दिन आणि राजभाषेचा अभिमान

## महाराष्ट्र दिनानिमित्त



आज एक मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन आहे. एक मे, मराठी भाषिकांच्या स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा स्मरण उत्सव आहे. मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र हा स्वतंत्र होण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये १०६ हुतात्म्यांचे बलिदान द्यावे लागले. त्यावेळेला, एक मे १९६० ला महाराष्ट्र आणि गुजरात हे दोन राज्य वेगवेगळे झाले, आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण बनले. महाराष्ट्र दिन हा आपली महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा, मराठी भाषेचा अभिमान, राज्याचा अभिमान दर्शवतो. आज कामगार दिन सुद्धा आहे. तसेच हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करतात. मराठी भाषा गौरव दिन हा २७ फेब्रुवारीला असतो आणि मराठी राजभाषा दिन हा एक मे ला असतो. २६ जानेवारी १९६५ पासून मराठी ही राजभाषा म्हणून जाहीर झाली. महाराष्ट्र अधिनियम १९६४ नुसार महाराष्ट्राची अधिकृत राज्यभाषा ही मराठी घोषित केली.

मराठी ही केवळ एक भाषा नसून, ममतेचे, वासल्याचे, संस्काराचे बोल आहे. मराठी भाषेमध्ये प्रचंड ताकद आहे. जागतिकीकरणामध्ये आपण मराठी भाषेला अजिबात विसरता कामा नये. छत्रपती शिवाजी महाराजांनी माय मराठी भाषेचे, मराठी संस्कृतीचे रक्षण केले होते. मराठी भाषा ही संपन्न, सुंदर आहे. आपण ती जगाला सांगितली पाहिजे. आपण महाराष्ट्रात राहतो. या मराठी भाषेने एक सांस्कृतिक छत्र आपल्यावर उभारले. आपल्याला लहानाचे मोठे केले आणि आपल्याला व्यक्त होण्यासाठी शब्दांची पखरण केली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी मराठी भाषेचे कौतुक केले, माझा मराठाचि बोलू कवतुके! परि अमृता ते ही पैजा जिंके!! ऐसे अक्षरे रसिके मेळवीन!! संत ज्ञानेश्वरांनी ५६ बोली भाषांना ज्ञानेश्वरीमध्ये स्थान दिले. मराठी भाषेने वेगवेगळ्या भाषांमधून शब्दसंपदा नेहमी स्वीकारली आहे. त्यामुळे मराठीचे शब्द भांडार वाढले आहे. मराठीचा प्रवास हा संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, महाराष्ट्री असा लक्षणीय आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अधिकृतपणे अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. तो दिवसही आपण स्वतंत्रपणे साजरा करतो. आज मराठी भाषेची ओळख जागतिक स्तरावर झाली आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा आहे.

मराठी भाषा ही शारदीय चांदण्यासारखी आहे. अत्यंत शितल, धवल, मोहक आणि तेजस्वी आहे. शारदीय चांदणे जसे मनाला शांतता व प्रसन्नता देतात, तशी आपली माय मराठी भाषा आहे. सर्व संतांनी आपापल्या अभंगामधून मराठी भाषेचा गौरव केला आहे. आपणही आपल्या मायबोली मराठीचा जागर करूया आणि मुलाखत देताना, बोलताना, संवाद करताना मराठीतूनच करूया. मी महाराष्ट्रात राहतो, त्या मुळे मला मराठी भाषेचा अभिमान आहे. कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणाले होते की, मराठी भाषेचा अभिमान जरूर असावा, परंतु दुराभिमान नसावा. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात, मराठी साहित्याचे फलित म्हणजे सत्यम, शिवम, सुंदरम. कुसुमाग्रजांच्या बाबतीत असे म्हणावे लागेल, परी कृतार्थ केली तुम्ही मराठी माती. मराठी भाषेच्या खांद्यावर आपण खेळलो, बागडलो. मराठी भाषा अधिक समृद्ध करण्याची जबाबदारी आपलीच आहे.

म्हणून आज एक मे महाराष्ट्र दिनाबरोबर, महाराष्ट्र राजभाषा दिन, मराठीचा जागर करूया आणि मराठी मायबोली विश्वामध्ये नेऊया.

प्रा. शशांक गंधे.

# अवैध वाळू वाहतुकीवर घारगाव पोलिसांची धडक कारवाई



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- तालुक्याच्या कारभागात अवैध वाळू तस्करीने अक्षरशः उच्छाद मांडल्याचे चित्र समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर घारगाव पोलिसांनी साकूर गावाच्या शिवारात मोठी कारवाई करत सुमारे ७ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बुधवारी (दि. २९) पहाटे साडेचारच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या धडाकेबाज कारवाईमुळे अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

घारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, साकूर ते जांबूत मार्गावरील दिघी केटीवेअर परिसरात एका पिवळ्या रंगाच्या ट्रकमधून अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलीस हेड कॉन्स्टेबल सुभाष बोडखे व प्रमोद गाडेकर यांनी पंचांसह घटनास्थळी सापळा रचला. पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास संशयित ट्रक येताना दिसताच, पोलिसांनी त्याला थांबवून तपासणी केली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये दोन ब्रास वाळू आढळून आली. मात्र, चालकाकडे वाळू वाहतुकीसाठी कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे स्पष्ट झाले.

याप्रकरणी पोलिसांनी चालक किरण भाऊसाहेब टेकुडे (वय ३७, रा. टेकडवाडी, ता. पारनेर) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने ही वाळू भास्कर खंडू मेंगाळ (रा. जांबूत बुद्रुक, ता. संगमनेर) यांच्या सांगण्यावरून मुळा नदी पात्रातून भरून आणत असल्याची कबुली दिली. या कारवाईत पोलिसांनी अंदाजे १२ हजार रुपये किंमतीची दोन ब्रास वाळू आणि सुमारे ७ लाख रुपये किंमतीचा ट्रक (क्र. एमएच. १६, सीडी. ६८८४) असा एकूण ७ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद गाडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास घारगाव पोलीस करत आहेत.

अकलापूरच्या शेळकेवाडी परिसरातूनही मोठ्या प्रमाणात अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती समोर येत आहे. मुळा नदीपात्रातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात असून, याकडे स्थानिक महसूल विभाग व रात्रगस्त पथक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर घारगाव पोलिसांनी शेळकेवाडी परिसरातही अशाच प्रकारच्या धडक कारवाया कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून जोर धरत आहे.

# खेळातून आयुष्य घडतं - डॉ. जाधव

## इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- अभ्यासाबरोबरच खेळालाही तितकंच महत्व द्यावं, त्यातूनच आपलं आयुष्य घडतं, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, क्रीडा प्रशिक्षक डॉ. नारायण जाधव यांनी केले. जि. प. प्राथमिक शाळा पोखरी हवेलीच्या इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभप्रसंगी ते बोलत होते. इयत्ता पहिलीपासून सातवीपर्यंत आपण या शाळेत शिक्षण घेऊन आपल्या व्यक्तिमत्व विकासाचा पाया या शाळेतूनच भक्कम केला आहे. आपली पहिली शाळा आपण आयुष्यभर कधीही विसरू शकत नाही, असेही ते म्हणाले. याप्रसंगी सरपंच सुदाम खैरे, उपसरपंच सोमनाथ थिटमे, सामाजिक कार्यकर्ते गजानन घुले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन आगळे, सदस्य नंदू घुले, वाल्मिक तारगे, आदीसह पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक एकनाथ साबळे यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते गजानन घुले व वर्गशिक्षक शिवाजी नरवडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. रुद्राक्ष गडाख, संकेत भवर, आर्यन गायकवाड, विनायक बर्डे, अजय जाधव, स्नेहा माळी, तनुजा डुबे, गुंजन शेलार या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत आपल्या वर्गासाठी दर्जेदार कंपनीचा एक पंखा भेट देण्यात आला. प्रमुख पाहुणे डॉ. नारायण जाधव यांच्या शुभहस्ते सर्व विद्यार्थी व वर्गशिक्षक यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपक्रमशील शिक्षक दस्तगीर शेख, शकुंतला शेळके, सोनाली बागुल, सखाराम पाटील, राजेंद्र सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सोमनाथ मदने यांनी केले, तर आभार सुरेश साळुंके यांनी मानले.

# भोंदू गडगे बाबासह साथीदाराला १४ दिवसांची पोलीस कोठडी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- वडगावपान येथील तथाकथित 'दत्ताधाम सरकार'चा प्रमुख भोंदू बाबा राजेंद्र बापू गडगे याच्या फसवणुकीचा पर्दाफाश झाल्यानंतर न्यायालयाने त्याच्यासह साथीदार मधुकर शिंदे यास १४ दिवसांची म्हणजेच १३ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.



भोंदू बाबा गडगे व शिंदे यांच्या अटकेनंतर अन्य तिघे अद्याप फरार असून, त्यांचा तपास सुरू आहे. गडगे बाबाची मुलगी ज्ञानेश्वरी गडगे, डॉ. मोहन पुरी आणि सूरज शिंदे हे तिघे आरोपी अद्याप फरार आहेत.

यापूर्वी न्यायालयाने दि. २३, २७ आणि २९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी वाढवली होती. मात्र, तपासातील तांत्रिक बाबी लक्षात घेता ही मुदत आता १३ मेपर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी दिली. भोंदू बाबा गडगेकडून नागरिकांचा विश्वास संपादन करण्यासाठी बनवण्यात आलेल्या व्हिडीओंची शहानिशा सुरू आहे. नागरिकांनी पुढे येऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले आहे.

# राज्यात उकाड्याचा तडाखा वाढला

## हवामान विभागाचा सतर्कतेचा इशारा

मुंबई (प्रतिनिधी)- मागील काही दिवसांपासून हवामानात सतत मोठा बदल होताना दिसत आहे. त्यामध्येच आता भारतीय हवामान विभागाने मुंबईकरिता अत्यंत मोठा इशारा दिला. मुंबईत पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहणार आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात उष्णतेचा तडाखा वाढला असून, पुढील पाच दिवसांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. सध्याच्या घडीला संपूर्ण राज्यातच उष्णतेची लाट आहे.

मुंबईच्या मरिन ड्राइव्ह, क्वीन नेकलेसवर लोकांची वर्दळ कमी झाली आहे. मुंबईत पुढील चार दिवस तापमान सुमारे ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सांताक्रुझ वेधशाळेत किमान २८ आणि कमाल ३४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, मंगळवार आणि बुधवारीही अशीच स्थिती राहण्याचा अंदाज आहे. गुरुवारी तापमान किंचित घटून ३३ अंशावर येईल, तर आठवड्याअखेर सरासरी तापमान ३४ अंश राहण्याची शक्यता आहे. उष्णतेची लाट कायम राहणार असल्याने दुपारच्या वेळेत कडक उन्हाचा सामना करावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने नागरिकांसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना (एस.ओ.पी.) जारी केल्या आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुलांना किंवा पाळीव प्राण्यांना बंद वाहनात किंवा उन्हात एकटे सोडू नये, असा कडक इशाराही देण्यात आला आहे.

शक्यतो घरात राहून सावलीत वेळ घालवण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे. सकाळी किंवा दुपारी थेट सूर्यप्रकाश येणाऱ्या खिडक्यांवर पडदे किंवा शेड्स लावावेत, तसेच स्थानिक हवामानाचा अंदाज नियमितपणे तपासावा, असे सूचित करण्यात आले आहे. शक्यतो घरात राहून थेट उन्हात जाणे टाळावे. वातानुकूलन सुविधा नसल्यास घराच्या खालच्या मजल्यावर किंवा सावलीच्या ठिकाणी राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यासोबतच दुपारी १२ ते ४ घराबाहेर पडणे टाळा.

उन्हातून आल्यावर थोडाजरी त्रास झाला तरीही लगेचच डॉक्टरांसोबत संपर्क साधा. मुंबईसह विदर्भातही स्थिती गंभीर आहे. विदर्भात ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे पारा जाताना दिसला. आजही मराठवाडा आणि विदर्भात उष्णतेच्या लाटेचा मोठा इशारा देण्यात आला. पुढील काही दिवस मुंबईसह राज्यात उष्णतेची लाट कायम राहणार आहे. नाशिकमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना महत्त्वाचे आवाहन देखील केले. अनेक शहरांमध्ये शाळा, महाविद्यालय आणि कोचिंग क्लासेसच्या वेळाही बदलण्यात आल्या आहेत.

# सीमेवरची शिस्त, आता शेती-उद्योगात, कोपरगावात 'सैनिक राजा' आटा प्रकल्प

देशाच्या सीमेवर बर्फाच्छादित शिखरांवर उभे राहून, आपल्या जीवाची पर्वा न करता देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना आपण नेहमीच सलाम करतो. पण जेव्हा हेच जवान निवृत्तीनंतर पुन्हा समाजासाठी उभे राहतात, तेव्हा ती केवळ कथा राहत नाही - ती प्रेरणेची चळवळ बनते. कोपरगाव परिसरातील सहा माजी सैनिकांनी अशीच एक नवी वाट तयार करत 'सैनिक राजा' आटा प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योग आणि समाजसेवेचा सुंदर संगम घडवून आणला आहे. 'सैनिक रूट शेतकरी ॲग्रो फूड प्रोसेसिंग प्रायव्हेट लिमिटेड' या नावाने उभारलेला हा प्रकल्प, सध्या परिसरातील उद्योजकतेचा एक आदर्श ठरत आहे. भारतीय सैन्यातील शिस्त, प्रामाणिकपणा, चिकाटी आणि संघभावना या मूल्यांना बळ देत, युवराज गांगवे, सुभाष क्षीरसागर, गोपीनाथ गांगुर्डे, विनोद थोरात, राजेंद्र मसाने आणि मधुकर इनामके, या सहा माजी सैनिकांनी या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली आहे.

देशसेवा पूर्ण झाल्यानंतर निवांत आयुष्य जगण्याचा मार्ग निवडण्याऐवजी, या जवानांनी समाजाला काहीतरी परत देण्याचा निर्धार केला. या उपक्रमाबद्दल बोलताना संस्थापक माजी सैनिक युवराज गांगवे सांगतात, सीमेवर असताना आम्ही देशाची सुरक्षा केली, पण आता आमच्या मातीतल्या लोकांच्या आरोग्याची सुरक्षा करणे हेच आमचे पुढचे कर्तव्य आहे. हीच आमच्यासाठी खरी दुसरी इनिंग आहे. आजच्या बाजारपेठेत भेसळयुक्त अन्नपदार्थांची समस्या गंभीर होत चालली आहे. विशेषतः दैनंदिन वापरातील पिठाच्या शुद्धतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या समस्येवर ठोस उपाय म्हणून, या माजी सैनिकांनी थेट शेतकऱ्यांकडून दर्जेदार गहू खरेदी करून, त्यावर अत्याधुनिक पद्धतीने प्रक्रिया करण्याचा मार्ग स्वीकारला.

'सैनिक राजा' या ब्रँडअंतर्गत ते ग्राहकांना १०० टक्के शुद्ध, पौष्टिक आणि विश्वासार्ह पीठ उपलब्ध करून देत आहेत. हा प्रकल्प केवळ एक व्यवसाय नाही, तर सहा सैनिकांच्या एकीचे, जिद्दीचे आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. अत्याधुनिक यंत्रसामग्री, स्वच्छता आणि प्रत्येक टप्प्यावर काटेकोर गुणवत्ता नियंत्रण, यामुळे उत्पादनाचा दर्जा सातत्याने टिकवून ठेवला जातो. या उपक्रमाचा सर्वात मोठा फायदा स्थानिक शेतकऱ्यांना होत आहे. त्यांच्या उत्पादनाला आता एक विश्वासार्ह बाजारपेठ मिळत असून, योग्य दरही मिळू लागले आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळत आहे. त्यामुळे हा प्रकल्प आर्थिकच नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचाही एक महत्त्वाचा आधार ठरत आहे.

विशेष म्हणजे, शहरांमध्ये स्थायिक होण्याची संधी असतानाही, या सैनिकांनी गावात राहून उद्योग उभारण्याचा निर्णय घेतला. त्यांनी केवळ एक व्यवसाय उभा केला नाही, तर देशसेवा ही फक्त सीमारेषेपुरती मर्यादित नसते, हा संदेश आपल्या कृतीतून दिला आहे. त्यांच्या या प्रवासाची प्रेरणादायी कहाणी 'उद्योग स्पार्क' या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून अनेकांपर्यंत पोहोचत असून, नवउद्योजकांना मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळत आहे. 'सैनिक राजा' हा ब्रँड आज केवळ एक उत्पादन राहिलेला नाही, तर तो विश्वास, शुद्धता आणि सेवाभावनेचे प्रतीक बनला आहे. या सहा माजी सैनिकांनी दाखवून दिले आहे की, जिद्द, प्रामाणिकपणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा असेल, तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. या प्रेरणादायी उपक्रमाबद्दल अधिक माहिती घेण्यासाठी किंवा त्यांच्या उत्पादनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक नागरिकांनी युवराज गांगवे यांच्याशी ८८०५१५१७१९ या क्रमांकावर संपर्क साधावा.





**कोपरगाव व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष सुधीर डागा म्हणाले : सैनिक राजा आटा प्रकल्पाचे मालक आणि त्यांच्या सर्व भागीदारांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. सैनिकी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर, देशसेवा केल्यानंतर त्यांनी समाज आणि शेतकऱ्यांच्या सेवेसाठी पुढे येणे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. एखादी इंडस्ट्री उभारणे हे मोठे धाडस असते. काही क्षेत्रांमध्ये विशिष्ट घटकांची मक्तेदारी असते, मात्र या सर्व माजी सैनिकांनी दाखवलेले धाडस निश्चितच कौतुकास्पद आहे. व्यापारी महासंघाच्या वतीने या प्रकल्पाला मनःपूर्वक शुभेच्छा देतो. तसेच नागरिकांना आवाहन करतो की, आपल्या परिसरात तयार होणारे शुद्ध आणि दर्जेदार उत्पादन वापरून स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे. 'सैनिक राजा' हे केवळ नफा कमावण्यासाठी नव्हे, तर सेवाभावनेतून काम करणारे एक आदर्श उदाहरण आहे.**

**विशेष प्रतिक्रिया । उद्योग स्पार्क उद्योग स्पार्क च्या वतीने असे मत व्यक्त करण्यात आले : ग्रामीण भागात उद्योग उभारणे हे केवळ आर्थिक निर्णय नसून, सामाजिक जबाबदारीचे पाऊल असते. 'सैनिक राजा' आटा प्रकल्प हा त्याचाच उत्तम नमुना आहे. माजी सैनिकांनी देशसेवेतील शिस्त आणि प्रामाणिकपणा यांचा उपयोग करून, स्थानिक पातळीवर उद्योग उभारला, ही बाब निश्चितच प्रेरणादायी आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळत आहे आणि ग्राहकांना शुद्ध अन्नाचा पर्याय उपलब्ध होत आहे. आजच्या काळात स्थानिक उत्पादनांना पाठबळ देणे अत्यंत गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागात स्वावलंबन आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.**

वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंटने घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
8080 215 215
9699 327 301

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
Diamond Jewellery Launching
(Coming Soon)
Vacancy for 4 Sales Officers
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

अध्यक्ष, संगम सेवाभावी ट्रस्टचे आधारवड व आमचे गुरूवर्य
मा. डॉ. भानुदासजी डेरे पाटील
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक
गुरुप्रसाद जनरल हॉस्पिटल
घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
डॉ. विक्रम मारूती पानसरे
डॉ. नम्रता विक्रम पानसरे

# मोगलपुरा भागात १२० किलो गोमांस जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात अवैध कत्तलखाने बंद झाल्याचा दावा वारंवार केला जातो. मात्र अजूनही हे कत्तलखाने बिनदिक्कतपणे सुरू आहे. संगमनेर शहरातील मोगलपुरा भागातील अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून १२० किलो गोमांस जप्त केले आहे.

संगमनेर शहरामध्ये पेट्रोलींग करताना या पथकास मजरेहक मोहमंदनदीम कुरेशी (रा. मोगलपुरा संगमनेर) हा साथीदारासह राहत्या घराच्या शेजारी खोलीमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करत आहे, अशी माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी एका खोलीमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल केल्याचे दिसून आले. पोलिसांनी मजरेहक मोहमंदनदीस कुरेशी (वय-२८ वर्षे रा. मोगलपुरा, खाटीक गल्ली, संगमनेर,) याच्या ताब्यातून ३६ हजार रुपये किमतीचे १२० किलो गोमांस, लोखंडी सुरी, सत्तुर, कुऱ्हाड असा एकूण ३७हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपीविरुध्द संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१,३२५,३ (५) प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (ब), ५ (क), ९, प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखालील स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार गणेश लबडे, दिपक घाटकर, विजय पवार, गणेश लोंढे, सोमनाथ झांबरे, संतोष खैरे या पथकाने ही कारवाई केली आहे.

# महेश पतसंस्थेतर्फे ज्येष्ठ सभासदांना आयुष्मान वयवंदना योजना कार्डचे वितरण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महेश पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. मोहनलालजी मणियार यांच्या स्मरणार्थ, महेश पतसंस्था व महेश अर्बन सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ सभासदांसाठी आयुष्मान वयवंदना योजना नोंदणीचे शिबिर नुकतेच आयोजित करण्यात आले होते. संस्थापक संचालक डॉ. शशिकांत पोफळे व अनिल अट्टल , माजी चेअरमन इंजि.दिनेश सोमाणी, माजी व्हा. चेअरमन संतोष चांडक व महेश अर्बन सेवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष राजकुमार लाहोटी, यांच्या संकल्पनेतून हे शिबिर आयोजित केले गेले. या शिबिरास सुमारे १०० ज्येष्ठ सभासदांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नोंदणीनंतर आलेल्या कार्डचे वितरण आज बुधवार, दि. २९/०४/२०२६ रोजी स्वर्गीय मोहनलालजी मणियार यांच्या स्मृतिदिनानिमित्त गणेशलालजी बाहेती, सुरेशजी जाजू, सुभाषजी दरक, सुभाषजी जाजु, विजयकुमारजी भुतडा, राजेंद्रप्रसादजी सोमाणी, श्रीमती गोमतीकाकी मणियार, श्रीमती चंद्रकलाकाकी राठी, श्रीमती ताराकाकी कासट, सौ. ललिताकाकी करवा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले यावेळी चेअरमन सी.ए. कैलास सोमाणी यांनी मनोगत व्यक्त केले व व्हा. चेअरमन राजेश लड्ढा यांनी सर्वांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. माजी चेअरमन विशाल नावंदर व व्यवस्थापक दिगंबर आडकी यांनी सूत्रसंचालन केले. इंजि. श्रीकांत (लालाभाऊ) मणियार यांनी सर्वांचे आभार मानले. संपूर्ण शिबिराच्या यशस्वीतेसाठी, इंजि. दिनेश सोमाणी, संतोष चांडक,सौ. ज्योती कासट, डॉ. शशिकांत पोफळे, श्रीकांत मणियार अनिल अट्टल यांनी विशेष प्रयत्न केले .

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# आश्वी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## भरदिवसा घरात घुसून चोरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरीच्या सत्राने नागरिक भयभीत झाले असून, बुधवारी (दि. २९) दाढ खुर्द शिवारात चोरट्यांनी चक्क भरदिवसा घरात घुसून एका अल्पवयीन मुलाला धाक दाखवत रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने लंपास केले आहेत. त्यामुळे पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दाढ खुर्द शिवारातील हरणदरा परिसरात धोंडीबा जोशी यांची वस्ती आहे. बुधवारी जोशी कुटुंबातील सदस्य कामानिमित्त घराबाहेर गेले होते. दुपारी १ वाजेच्या सुमारास, जेव्हा घरात फक्त एक अल्पवयीन मुलगा होता, तेव्हा घराच्या मागील बाजूने चार अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरात अनोळखी व्यक्तींना पाहून मुलाने त्यांना हटकण्याचा प्रयत्न केला. मात्र, एका चोरट्याने मुलाला धाक दाखवत दाबून धरले. मुलाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु, त्यांचा नाइलाज झाला. त्याच वेळी इतर तीन चोरट्यांनी घरातील सामानाची उचकापाचक सुरू केली. या लुटीत चोरट्यांनी घरातील सुमारे दीड ते दोन लाखांची रोख रक्कम आणि तीन ते साडे तीन तोळे सोन्याचे मौल्यवान दागिने असा मोठा ऐवज चोरून नेल्याचा अंदाज वर्तवला आहे.

या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी तात्काळ हवालदार एम. एस. आहेर आणि सहकाऱ्यांना घटनास्थळी पाठवले. माहिती मिळताच सरपंच सतिश जोशी यांनी देखील घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरा याप्रकरणी तक्रार दाखल होण्याची शक्यता असून, पोलिसांकडून पंचनामा केल्यानंतरच चोरीला गेलेल्या एकूण मुद्देमालाची नेमकी किंमत स्पष्ट होणार आहे. आश्वी पंचक्रोशीतील गावांमध्ये चोरीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. चोरट्यांनी थेट दिवसाढवळ्या वस्त्यांवर येऊन लुटमार सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्सरे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑप्पॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

१ मे
दर्शन टेक्सटाईल मार्केट
महाराष्ट्र दिन व कामगार दिन
निमित्त हार्दिक शुभेच्छा..!
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोष्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25